Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 06 January 2026

Time 01.00 to 01.05 PM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक ०६ जानेवारी २०२६ दुपारी १.०० वा.**

****

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ–सीबीएसईनं विद्यार्थ्यांच्या परीक्षा संबंधित ताणतणावासंदर्भात त्यांना सहाय्य करण्याच्या दृष्टीनं आज एक मनो–सामाजिक समुपदेशन मदत वाहिनी सुरू केली आहे. दहावी आणि बारावीची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी या सेवेचा पहिला टप्पा येत्या एक जूनपर्यंत सुरू राहणार आहे. येत्या परीक्षांदरम्यान विद्यार्थ्यांचा परीक्षाजन्य ताणतणाव कमी होऊन त्यांची मानसिक स्थिती सुदृढ रहावी, आणि त्यांनी आत्मविश्वासानं, समतोलपणानं, मानसिक स्पष्टतेसह परिक्षा द्याव्यात, या उद्देशानं मंडळानं ही सेवा सुरू केली आहे. विद्यार्थी १८०० ११८० ०४ या क्रमांकावर दिवसाच्या कोणत्याही वेळी या सेवेचा लाभ घेऊ शकतील.

****

नवी दिल्लीत विज्ञान भवनात आज केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते सीएसआर परिषदेचं उद्घाटन होणार आहे. पोषण, सुरक्षा आणि कुपोषण निवारणामध्ये सामाजिक उत्तरदायित्व निधीची भूमिका या विषयावरील ही परिषद असून, यामध्ये मुलांमधील कुपोषणाचा सामना करण्यासाठी सहयोगी, नाविन्यपूर्ण आणि शाश्वत धोरणांवर विचारमंथन करणं, हा या परिषदेचा उद्देश आहे. या परिषदेदरम्यान अमित शहा यांच्या हस्ते शिशू संजिवनी उपक्रमाचं उद्घाटन करण्यात येणार असून, त्याद्वारे महाराष्ट्रातल्या नागपूर जिल्ह्यातल्या अंगणवाडी केंद्रांमध्ये शिकणाऱ्या सुमारे तीन हजार मुलांना पौष्टिक आहार प्रदान करण्यात येणार आहे.

****

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री सुरेश कलमाडी यांचं आज पुण्यात वृद्धापकाळाने निधन झालं, ते ८२ वर्षांचे होते. भारतीय हवाई दलात पायलट म्हणून आपल्या कारकिर्दीची सुरुवात करून कलमाडी यांनी पुणे शहराच्या राजकीय, सामाजिक, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रात ठसा उमटवला. मात्र २०१० मध्ये झालेल्या राष्ट्रकूल क्रीडा स्पर्धेच्या आयोजन समितीचे अध्यक्ष असताना भ्रष्टाचाराचे आरोप झाल्यानंतर त्यांच्या कारकिर्दीला मोठा धक्का बसला. एप्रिल २०२५ मध्ये सक्तवसुली संचालनालयाने याप्रकरणी सादर केलेल्या अहवालानंतर त्यांना क्लीन चिट मिळाली होती. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कलमाडी यांच्या निधनाबद्दल दु:ख व्यक्त करत त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

****

दर्पण दिन आज साजरा होत आहे. मराठी वृत्तपत्राचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण हे मराठी वृत्तपत्र सुरू केल्याच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो. या निमित्ताने पत्रकारिता महाविद्यालयांसह विविध संस्था संघटनांच्या वतीनं अनेक कार्यक्रमांच्या आयोजनातून आचार्य जांभेकरांना अभिवादन केलं जातं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन केलं असून, राज्यातल्या पत्रकारांना शुभेच्छा दिल्या आहेत.

****

“हिंद-दी-चादर” श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५०व्या हौतात्म्य वर्षानिमित्त नांदेड इथं येत्या २४ आणि २५ जानेवारी रोजी भव्य कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शासकीय अधिकारी, कर्मचारी, गुरुद्वारा प्रशासन तसंच विविध अशासकीय सदस्यांचा सहभाग असलेल्या २५ विविध समिती गठीत करण्यात आल्या आहेत. हा कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध, नियोजनबद्ध आणि यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी प्रत्येक समितीने नेमून दिलेली जबाबदारी काटेकोरपणे पार पाडावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केलं. हिंद-दी-चादर कार्यक्रमाच्या अनुषंगाने स्थापन करण्यात आलेल्या समित्यांचा सविस्तर आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते.

****

बीड शहरात तारांगण आणि विज्ञान केंद्र उभारण्याला प्रशासकीय मान्यता मिळाल्याची माहिती आमदार विजयसिंह पंडित यांनी दिली. विज्ञान केंद्रांमध्ये चार माहिती केंद्र असतील तर तारांगणामधे विविध ग्रह, तारे, उल्का, आकाशगंगा आदींची माहिती दिली जाणार आहे. २८ कोटी रुपये खर्चाचं हे तारांगण आणि विज्ञान केंद्र उभारण्याची घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली होती.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या खुलताबाद नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्ष पदासाठी तसंच स्वीकृत सदस्य पदासाठी १३ जानेवारी रोजी पीठासीन अधिकारी तथा नगराध्यक्ष सय्यद आमेर पटेल यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभेचं आयोजन करण्यात आले आहे. खुलताबाद नगरपरिषदेत राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वाधिक नऊ नगरसेवक, भारतीय जनता पक्षाचे सात, तर काँग्रेसचे चार नगरसेवक आहेत.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या सिल्लोड इथं एसटी आगारात सुरक्षितता अभियानाचं उद्घाटन आगारप्रमुख विजयकुमार काळवणे यांच्या उपस्थितीत झालं. चालकांनी अतिवेगाने वाहन चालवू नये, चुकीच्या पद्धतीने पुढील वाहनाला ओलांडून जाऊ नये, आवश्यक ती काळजी घेऊन वळण घेणे, आदींबाबत त्यांनी उपस्थित कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केलं.

****

देशभरात अनेक ठिकाणी दाट धुक्यामुळे रेल्वे सेवेवर परिणाम झाला आहे. यामुळे अनेक रेल्वेगाड्या उशिरानं धावत आहेत. प्रवाशांनी रेल्वेस्थानकांवर येण्यापूर्वी आपल्या गाडीच्या स्थितीची माहिती करून घ्यावी, असं आवाहन विभागाने केलं आहे.

****